| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १८ वा | शुक्रवार दिनांक २० मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## आवकाळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानाचे तात्काळ पंचनामे; शेतकऱ्यांना मदतीसाठी प्रशासन सज्ज

धाराशिव,दि.१८ मार्च (जिमाका)माहे मार्च,२०२६ मध्ये जिल्ह्यात झालेल्या आवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीपिकांचे तसेच जिवित व वित्तीय नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना शासनामार्फत मदत मिळण्यासाठी नुकसानाचे अचूक पंचनामे करणे आवश्यक आहे. यासाठी तालुकास्तरीय समितीच्या आदेशानुसार ग्रामस्तरीय समितीमार्फत बाधित क्षेत्रामध्ये तात्काळ पंचनामे करण्यात येत आहेत. संबंधित सर्व यंत्रणांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून विहित नमुन्यात पंचनामे पूर्ण करावेत,अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,सर्व उपविभागीय अधिकारी,सर्व उपविभागीय कृषी अधिकारी,धाराशिव,सर्व तहसीलदार तसेच सर्व तालुका कृषी अधिकारी यांना निर्देश देण्यात आले आहेत की, ग्रामस्तरीय समितीमार्फत करण्यात आलेल्या पंचनाम्यांच्या आधारे विहित नमुन्यातील निधी मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी देखील आपल्या क्षेत्रातील पीक नुकसान व फळबाग नुकसानीची माहिती संबंधित ग्रामस्तरीय समिती म्हणजे ग्राम महसूल अधिकारी,कृषी सहाय्यक व ग्रामपंचायत अधिकारी यांचेकडे तात्काळ कळवावी, जेणेकरून पंचनामे वेळेत पूर्ण करून शासनाकडे मदतीचा प्रस्ताव सादर करता येईल,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.तसेच ज्यांची ई-पीक पाहणी बाकी आहे,त्यांस ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ मिळाली असल्याने सर्व उर्वरित ई-पीक पाहणी सहाय्यकांमार्फत करून घ्यावी,असेही निर्देश देण्यात आले आहेत.

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ३१ मार्चपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी लागू

धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अंतर्गत जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश काढण्यात आले आहे.त्यानुसार १८ मार्च रोजी रात्री १ पासून ते ३१ मार्च २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरून) संपूर्ण जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात येणार आहेत.जिल्ह्यात १९ मार्च रोजी गुढी पाडवा,२१ मार्च रोजी रमजान ईद, २६ मार्च रोजी रामनवमी,२७ मार्च रोजी तुळजाभवानी चैत्री यात्रा (तुळजापूर) ३० मार्च रोजी येडेश्वरी चैत्री यात्रा (येरमाळा) आणि ३१ मार्च रोजी महावीर जयंती असे विविध धर्मीय सण मोठ्या प्रमाणात साजरे होणार आहेत.

या सण-उत्सवांदरम्यान मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सध्या जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांच्या उभारणीसंदर्भात विविध समाजांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.याशिवाय विविध संघटना व राजकीय पक्षांकडून धरणे,मोर्चे,आंदोलन,उपोषण, बंद,रास्तारोको,तालाठोको अशा आंदोलनात्मक कार्यक्रमांची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी आपल्या अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी केला आहे.या आदेशानुसार,शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तींना शस्त्र,काठी, तलवार,बंदूक,लाठ्या किंवा शारीरिक इजा होऊ शकतील अशा वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दगड,फेकावयाची साधने किंवा तत्सम वस्तू साठवणे,तयार करणे किंवा बाळगणे यास मनाई करण्यात आली आहे.

याशिवाय आवेशपूर्ण भाषणे करणे, प्रक्षोभक घोषणा देणे,असभ्य वर्तन करणे, समाजात तेढ निर्माण होईल अशा प्रतिमा, फलक किंवा चिन्हांचा वापर करणे, संविधानविरोधी कृती करणे किंवा सार्वजनिक शांतता भंग करणारी कृती करण्यास मनाई करण्यात आली आहे. व्यक्ती,मृतदेह किंवा त्यांचे प्रतीकात्मक प्रदर्शन करण्यासही बंदी घालण्यात आली आहे.

तसेच पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना परवानगीशिवाय एकत्र येण्यास,मोर्चा किंवा मिरवणूक काढण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. कोणतीही सभा, मोर्चा किंवा निवडणूक प्रचार कार्यक्रम आयोजित करायचा असल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

दरम्यान,अंत्ययात्रा,धार्मिक विधी, लग्नसमारंभ,सामाजिक कार्यक्रम, शासकीय कार्यक्रम तसेच सिनेमागृह व रंगमंच यांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.तसेच शासकीय सेवेत कार्यरत कर्मचारी यांनाही या आदेशातून वगळले आहे.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून शांतता सुव्यवस्था राखण्यास सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## भीषण अपघात, धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सावंत बालंबाल बचावले

परांडा (जि. धाराशिव) - सोलापूर-पुणे महामार्गावर गुरुवारी मध्यरात्री एक भीषण अपघाताची घटना घडली. धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या फॉर्च्युनर कारला एका भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की गाडीचा काही भाग चक्काचूर झाला आहे. सुदैवाने सावंतांसह त्यांचे सहकारी व अंगरक्षक यात सुखरूप बचावले आहेत.

मुंबई येथे बुधवारी दुपारी भाजप प्रवेश सोहळा झाल्यानंतर माजी माजी उपाध्यक्ष तथा विद्यमान सदस्य धनंजय सावंत आपल्या फॉर्च्युनर ( एमएच.१२-एसइ. ५५५९) गाडीने परंड्याकडे रवाना झाले होते. ते गुरुवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास भिगवणजवळील डाळज गावाच्या हद्दीत आले असता, समोरून येणाऱ्या कंटेनरने ( एमएच. १२-डब्ल्यूजे. ६३७४) त्यांच्या वाहनाला भीषण धडक दिली. धडक इतकी जोरात होती की आलिशान फॉर्च्युनरच्या चालकाच्या बाजूचा पूर्ण भाग चक्काचूर झाला आहे. दरम्यान, सुदैवाने या भीषण अपघात धनंजय सावंत यांना कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. गाडीचा चालक आणि सुरक्षारक्षक किरकोळ जखमी झाले असून, त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कार्यकर्त्यांचे प्रेम, शुभेच्छा आणि ईश्वराची कृपा यामुळेच मी आज या भीषण संकटातून सुखरूप बाहेर आलो आहे. थोड्या किरकोळ जखमा झाल्या असल्या तरी प्रकृती स्थिर आहे, कुणीही काळजी करू नये. असे आवाहन धनंजय सावंत, माजी उपाध्यक्ष, जिल्हा परिषद यांनी केले आहे.

## क्राईम न्युज

### स्प्रिंकलरच्या चिमण्या, वायरची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गणेश प्रभाकर निंबाळकर, वय ४० वर्षे, रा.ह.मु. बार्शी नाका धाराशिव रा.महादेववाडी ता. जि. धाराशिव यांचे शेत गट नं ४६ मधील पत्र्याचे शेडचे पत्रे काढुन अज्ञात व्यक्तीने दि. १८.०३.२०२६ रोजी स्प्रिंकलरच्या चिमण्या, वायर, व दिनेश दत्तु शिंदे यांचे शेतातील मोटारीचे वायर असा एकुण ११,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गणेश निंबाळकर यांनी दि.१८.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### स्कुटीची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राजेंद्र महादेव साखरे, वय ५४ वर्षे, रा. शुक्रवार पेठ साळुंखे गल्ली तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची यामाहा कंपनीची स्कुटी ही दि.१३.०६.२०२६ रोजी इच्छापुर्ती गणपती मंदीरा समोरील कॅन्टीन समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- राजेंद्र साखरे यांनी दि.१८.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### नळदुर्ग येथून मोटारसायकलची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी न पांडुरंग दादाराव गवळी, वय ३५ वर्षे, रा. घाटणे ता. माढा जि. सोलापूर यांची अंदाजे २०,००० स्प्लेंडर प्लस मोटरसायकल जुना खंडोबा मंदीरा जवळील गर्दीच्या ठिकाणी मोकळ्या जागेतुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-पांडुरंग गवळी यांनी दि.१८.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### २,२७,५०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१८ मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २६२ कारवाया करून २,२७,५०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## उद्योगाशिवाय पर्याय नाही : कौशल्य,भांडवल व मार्केटिंगवर भर देऊन उद्योजक व्हा- महाव्यवस्थापक अमोल बडे




धाराशिव (जिमाका)-जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव,दे आसरा फाउंडेशन,पुणे तसेच व्यवस्थापन शास्त्र विभाग,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आज एमआयडीसी येथील विद्यापीठाच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये उद्योजक मेळावा उत्साहात संपन्न झाला.

या मेळाव्यात नवउद्योजकांनी उद्योग उभारणीसंदर्भातील विविध बाबींची सविस्तर माहिती जाणून घेतली. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांच्या हस्ते झाले.यावेळी एमआयडीसीचे क्षेत्रीय व्यवस्थापक डी.व्ही.खाडे,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे तसेच दे आसरा फाउंडेशनच्या सायली जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

उदघाटक म्हणून श्री.बळे म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येमुळे नोकरीच्या संधी कमी होत आहेत.त्यामुळे उद्योगाशिवाय पर्याय उरलेला नाही.जिल्ह्यात कृषीपूरक उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे. कौशल्य,आर्थिक पाठबळ,शासकीय मदत आणि प्रभावी मार्केटिंग या चार टप्प्यांवर शासन उद्योजकांना सहाय्य करत आहे. जिल्हा उद्योग केंद्र उद्योग उभारणीसाठी सदैव तयार असून विविध योजनांद्वारे ८०० पेक्षा अधिक उद्योगांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत मदत करण्यात आली आहे.असे त्यांनी यावेळी सांगितले.

एमआयडीसीचे क्षेत्रीय व्यवस्थापक श्री.खाडे म्हणाले की,उद्योजक होण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करणे अत्यावश्यक आहे.पूर्वी शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी मिळवणे हा होता,मात्र आता शिक्षणाचा उपयोग उद्योग निर्माण करण्यासाठी झाला पाहिजे.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूखंड,पायाभूत सुविधा व प्रशिक्षण उपलब्ध करून उद्योगांना चालना दिली जाते.गुंतवणूक व उद्योग निर्मिती हा विकासाचा मुख्य आधार असल्याचे ते म्हणाले.

श्री.खडसे म्हणाले की,धाराशिव हा आकांक्षित जिल्हा असून येथे शेती हा मुख्य व्यवसाय आहे.त्यामुळे शेतीपूरक उद्योगांची गरज अधिक आहे.अशा उद्योगांमुळे रोजगारनिर्मिती होऊन जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावू शकते.शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन युवकांनी उद्योगक्षेत्रात पुढे यावे.असे त्यांनी सांगितले.

श्रीमती.सायली जाधव म्हणाल्या की, स्वतःचा उद्योग उभारल्यास केवळ स्वावलंबनच नव्हे तर इतरांनाही रोजगार देता येतो.उद्योग सुरू करण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रभावी मार्केटिंग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उत्पादन केलेल्या वस्तूंची विक्री वाढवण्यासाठी बाजारपेठेचा अभ्यास आवश्यक आहे.असे त्या म्हणाल्या.

या मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून रुरल एंटरप्राइजेस फायनान्स सपोर्ट कन्सल्टंट श्रीमती.पल्लवी पाटील यांनी भांडवल गुंतवणूक व आर्थिक नियोजन यावर मार्गदर्शन केले.सनदी लेखापाल लक्ष्मण वाकुरे यांनी आयटीआर व जीएसटी रिटर्न भरताना घ्यावयाची काळजी यावर माहिती दिली.संजय देशमाने यांनी उद्योगातील आव्हाने व उपाय मांडले,तर अशोक चव्हाण (मुंबई) यांनी मार्केटिंगचे महत्त्व स्पष्ट केले. याशिवाय उद्योजक व मध उत्पादन तज्ज्ञ तेजस लिमकर यांची मुलाखत घेण्यात आली.

चर्चा सत्रात उपस्थित उद्योजकांनी प्रश्नोत्तरांमध्ये सक्रिय सहभाग घेत विविध शंकांचे निरसन करून घेतले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने उद्योजक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे संजय गुरव यांनी केले, आभार प्रदर्शन व्यवस्थापन विभाग प्रमुख सुयोग अमृतराव यांनी केले.

## निपाणी येथे महारेशीम मेळावा: रेशीम शेतीस नवे मार्गदर्शन



धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील निपाणी येथे आज दि.१८ मार्च रोजी महारेशीम अभियान २०२६ अंतर्गत शेतकरी मेळावा व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.या मेळाव्यात रेशीम शेती करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणी समजून घेण्यात आल्या तसेच रेशीम विकासाशी संबंधित विविध शासकीय योजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.राजकुमार मोरे,कळंब येथील गटविकास अधिकारी,तालुका कृषी अधिकारी,उपविभागीय अधिकारी शिंदे,रेशीम विकास अधिकारी श्रीमती वाकुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कळंब तालुक्यातील क्षेत्रसहायक श्री.एस.एच.सुर्यवंशी,श्री.एन.ए.पवार, तांत्रिक सहाय्यक जुनेद उस्मानी तसेच प्रगतिशील रेशीम शेतकरी श्री.बालाजी पवार आणि चॉकीधारक शेतकरी अतुल लुगडे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना तज्ज्ञांनी रेशीम शेतीतील उत्पादनवाढ,रोग व्यवस्थापन, कोषपालन तंत्रज्ञान तसेच शासनाच्या विविध अनुदान व सहाय्य योजनांचा लाभ घेण्याबाबत सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तर देत त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

या मेळाव्यास परिसरातील विविध गावांतील रेशीम शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच निपाणी गावचे तलाठी,कृषी सहाय्यक,ग्रामसेवक, सरपंच,उपसरपंच व इतर मान्यवरही उपस्थित होते.या उपक्रमामुळे रेशीम शेतीबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता वाढून उत्पादनवाढीस चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## मारुती बनसोडे यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कारासाठी निवड



धाराशिव (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मार्फत दिला जाणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कारासाठी नळदुर्ग ता. तुळजापूर येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव तथा सामाजिक कार्यकर्ते मारुती बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे.

मारुती बनसोडे यानी सन १९९ -९१ मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म शताब्दी वर्षात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी १०१ व्याख्यानाचा संकल्प केला व तो संकल्प त्यानी पूर्ण ही केला. त्यानंतर चिवरीच्या पशुहत्या विरोधी आंदोलनातील ते सक्रिय सहभागी झाले होते. दि. ०४ ऑगस्ट १९९६ ला तुळजापूर येथे त्यानी पुढाकार घेवून मराठवाडा पातळीवरील पोतराज प्रथा निर्मूलन निर्धार परिषद घेतली. अंधश्रध्दा निर्मल समितीचे संस्थापक कार्याध्याक्ष कै.डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्यासोबत त्यानी दहा वर्षे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले आहे. त्यानंतर परिवर्तन सामाजिक संस्थेची स्थापना केली या संस्थेच्या माध्यमातूनही धाराशिव जिल्ह्यात परंडा ,कळंब, तुळजापूर, लोहारा इत्यादी तालुक्यात त्यांनी विविध विषयावर काम केले आहे. नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने धाराशिव जिल्ह्याचे जिल्हा संघटक म्हणून ते गेली तीन-चार वर्षे काम करीत आहेत. सन २०२३ - २४ या कालावधीत व्यसनमुक्तीसाठी धाराशिव जिल्हयात अतिशय चांगल्या पद्धतीने काम केल्यामुळे राज्य शासनाने त्यांच्या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार - २२३ - २४ साठी निवड करण्यात आली आहे.सदर निवडी संर्भात दि.१८ मार्च २२६ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने एक जीआर काढलेला असून त्यामध्ये त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.धाराशिव जिल्ह्यातून एकमेव त्यांची या पुरस्कारासाठी निवडीबद्दल परिसरातून अनेकांनी त्यांना शुभेच्छा देवून आभिनंदन केले आहे.

# जळकोट येथील श्री केदारलिंगेश्वर देवस्थान यात्रा मोठ्या उत्साहात



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामदैवत तीर्थक्षेत्र श्री केदालिंगेश्वर देवालयाची यात्रा गुढीपाडव्या दिवशी मोठ्या शिवमय भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली. यात्रेनिमित्त मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. व तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री केदारलिंगेश्वर यात्रेनिमित्त गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी मंदिर दीपोत्सव साजरा करण्यात आला. त्यामुळे मंदिर व परिसर दिव्याच्या उजेडाने आकर्षित दिसत होता. यामध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. दीपोत्सवानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले .गुढीपाडव्याच्या पहाटे श्री केदारलिंगेश्वराला अभिषेक करण्यात आला. त्यानंतर श्री शिवाय नमोस्तुभ्यम अशा मंत्रघोषात आवाजात वाजत गाजत फटाकड्याच्या आतिश बाजीत नंदी ध्वज व पालखी मिरवणुकीची सुरुवात बसवेश्वर चौकातून करण्यात आली तसेच पुढे शिवाजी चौक ,संभाजीनगर व गावच्या प्रमुख मार्गावरून ही मिरवणूक मंदिराजवळ आल्यानंतर अग्नी प्रवेश कार्यक्रम संपन्न झाला. श्री केदारलिंगेश्वर मंदिरात जळकोट मठाचे मठपती श्री श्री श्री.१०८ श्री शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी, नंदगाव मठाचे मठपती म. नी. प्र .डॉ. राज शेखर महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नूतन जिल्हा परिषद सदस्य प्रतीक्षा गोपाळ सुरवसे, नूतन पंचायत समिती सदस्य आशिष गणेशदादा सोनटक्के, व तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचा फेटा, शाल, हार व केदारलिंगेश्वराची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी केदारलिंगेश्वर मंदिर ट्रस्ट व यात्रा महोत्सव कमिटीच्या वतीने सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या . श्री केदारलिंगेश्वराची यात्रा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मंदिर ट्रस्ट व यात्रा महोत्सव कमिटी यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत स्वामी सर यांनी केले.

# गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांचा पेठे यांच्यावतीने सत्कार



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर धाराशिव जिल्हा परिषदेत नवनिर्वाचित अध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त कादंबरीसह लेखणी व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

हा सत्कार दत्ता (तात्या) पेठे यांच्या हस्ते पार पडला. नव्या जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर अर्चनाताई पाटील यांना शुभेच्छा देत त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी सर्वांनी विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, सदर कादंबरी वाचण्याची इच्छा बऱ्याच दिवसांपासून होती, मात्र वेळेअभावी ते शक्य झाले नव्हते. आज सत्काराच्या निमित्ताने मिळालेली ही कादंबरी माझ्यासाठी विशेष स्मरणीय राहील आणि मी ती पूर्ण वाचणार आहे, असे त्यांनी सांगितले.

तसेच सत्कारावेळी देण्यात आलेल्या लेखणीबाबतही त्यांनी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली. ही लेखणी केवळ सन्मानाचे प्रतीक नसून, ग्रामीण भागातील नागरिकांच्या विकासासाठी निर्णय घेण्याची प्रेरणा आहे. मी जिल्हा परिषद अध्यक्षा म्हणून कार्यरत असताना याच लेखणीने काम करत राहीन आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करेन, असे आश्वासन त्यांनी दिले.

या सत्कार सोहळा प्रसंगी मेसा जानराव, शिवाजी क्षिरसागर, सुमेध क्षिरसागर, संतोष पेठे, शंकर मोरे, नेताजी क्षिरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा नेतृत्व विकास उद्बोधन शिबिर संपन्न




धाराशिव (प्रतिनिधी)- डॉ. बा.आ.म. विद्यापीठ, छ. संभाजीनगर व व्यंकटेश महाजन महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय नेतृत्व विकास उद्बोधन शिबिर मौजे - गडदेवदरी-खताळवाडी येथे संपन्न झाले.

शिबिराचे उद्घाटन दि.१ मार्च २०२६ संचालक प्रो. डॉ. सोमिनाथ खाडे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. महेश्वर कळलावे होते.

या शिबिरात योगाभ्यास, व्याख्यान, विविध गुण दर्शन, स्पर्धा, अभिरूप संसद इ. चे आयोजन करण्यात आले होते.

दि. ५ मार्च २०२६ रोजी शिबिराचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.हरिदास फेरे हे होते. तर स्वागताध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी सर, विशेष अतिथी मा.डॉ. नितीन पाटील, प्रमुख अतिथी मा.श्री. देविदास पाठक हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर गावच्या सरपंच सौ. मोहराबाई आढाव्ह, ग्रामसेवक श्री. प्रशांत गोरे व रा. से. यो. चे जिल्हा समन्वयक डॉ. बालासाहेब मैंद, डॉ. मनीषा कळसकर व डॉ. विनोद वायचळ, डॉ. शिला स्वामी, डॉ. सूर्यकांत आगलावे,डॉ. मेघश्याम पाटील, डॉ. नानासाहेब मनाळे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.से.यो. डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी केले तर आभार डॉ. बालासाहेब मैंद यांनी मानले. या कार्यक्रमास विविध महाविद्यालयातील रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी, गावातील ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुगार विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान उमरगा पोलीसांनी दि.१८.०३.२०२६ रोजी उमरगा पो ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापे टाकले. यावेळी गणेश रा.सोनेगुरुजी नगर उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे लॉज शेजारी उमरगा येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ९८० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले उमरगा पोलीसांना आढळले. सुरज रा.भाउसाहेब नगर तांडा बलसुर ता. उमरगा जि. धाराशिव हे बलसुर शिवारातील बलसुर ते काळनिंबाळा जाणारे रोडचे बाजूस मुंबई मटका जुगाराचे साहित्या एकुण ९४० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले उमरगा पोलीसांना आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान नळदुर्ग पोलीसांनी दि.१७.०३.२०२६ रोजी नळदुर्ग पो ठाणे हद्दीत जळकोट येथील उमरगा ते जाणारे रोडवर छापा टाकला. यावेळी महेश रा. जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव हे जळकोट येथील उमरगा ते नळदुर्ग जाणारे रोडवर कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ४,३९० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले नळदुर्ग पोलीसांना आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# धाराशिव येथे राज्यस्तरीय गंगाधर करंडक नाट्य स्पर्धा, नृत्य स्पर्धा आणि कलावंत मेळावा,२७ मार्च ते १ एप्रिल दरम्यान रसिकांना मेजवानी: कलावंत आणि रसिकांनी सहभागी व्हावे - विशाल शिंगाडे







धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, धाराशिव शाखेच्या वतीने राज्यस्तरीय 'गंगाधर करंडक' एकांकिका नाट्य स्पर्धा, नृत्य स्पर्धा आणि कलावंत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, २७ मार्च ते १ एप्रिल दरम्यान धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे विविध कार्यक्रम रंगणार आहेत. या स्पर्धांमध्ये कलावंत व रसिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कार्यकारिणी सदस्य विशाल शिंगाडे यांनी केले.

धाराशिव येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कार्यालयात गुरुवार दि. १९ मार्च रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी पत्रकार परिषदेस अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा धाराशिव चे तालुका अध्यक्ष डी.जी.कुलकर्णी, शेषनाथ वाघ, सुगत सोनवणे, शुभम खोत, सुरेश देवकुळे, विजय उंबरे, सत्यजित माने,सारीपूत शिंगाडे, यशवंत शिंगाडे ,ताहेर शेख, विश्वनाथ काळे, सुहास झेंडे, आलम बेग यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना शिंगाडे म्हणाले की, जागतिक रंगभूमी दिन आणि स्व. गंगाधर शिंगाडे यांच्या स्मरणार्थ गंगाधर करंडक आयोजित केला जातो. या पूर्वी घेण्यात आलेल्या सहा करंडक स्पर्धांना राज्यातील नाट्य संघांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा धाराशिवच्या वतीने सातव्या गंगाधर करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा घेण्यात येत आहेत. ही स्पर्धा २७, २८ आणि २९ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह धाराशिव येथे संपन्न होणार आहे. नाट्य स्पर्धे साठी नोंदणीची अंतिम मुदत २४ मार्च आहे.

तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद धाराशिव शाखेच्या वतीने भव्य नृत्य स्पर्धेचे आयोजन ३० व ३१ मार्च तर कलावंताच्या मेळाव्याचे आयोजन १ एप्रिल रोजी आयोजन छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे करण्यात आले आहे. या कलावंत मेळाव्यात राज्यातील कलाकार सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेचे उद्घाटन उद्योग मंत्री मा.ना.श्री उदय सामंत , खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील,आ. तानाजी सावंत, आ.कैलास पाटील , आ.प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलिस अधीक्षक रितु खोखर यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमात नाट्य परिषदेचे मध्यवर्ती कार्यालयाचे पदाधिकारी आणि कलावंत उपस्थित राहणार आहेत.

यावेळी शेषनाथ वाघ यांनी तयार केलेल्या गंगाधर करंडक स्पर्धे च्या लोगोचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नाट्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांची निवास व भोजनाची व्यवस्था आयोजकांच्या वतीने मोफत करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील तरुण-तरुणी नाट्य कलाकारांनी यामध्ये प्रवेश घेण्यासाठी व या नाट्य स्पर्धा पाहण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले.

या गंगाधर करंडक नाट्य स्पर्धे त सहभाग घेऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्या नाट्य संघास अनुक्रमे ५१ हजार ९९०, ३१ हजार व २१ हजार रुपये, चौथे बक्षीस ११ हजार तर उत्तेजनार्थ ५ हजार रुपये व गंगाधर करंडक चषक, प्रमाणपत्र आदी देऊन गौरविण्यात येणार आहे.तसेच उत्कृष्ट पार्श्वसंगीत, नेपथ्य, अभिनय स्त्री व पुरुष, प्रकाश योजना, संहिता लेखन आणि दिग्दर्शन यांनाही वैयक्तिक पारितोषिके देण्यात येणार आहेत.

भव्य नृत्य स्पर्धेत सहभाग घेऊन समूह नृत्य खुला गटामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्या नाट्य संघास अनुक्रमे २१ हजार, १५ हजार व १० हजार रुपये तर उत्तेजनार्थ ५ हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत. तर वैयक्तिल नृत्य स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्या नाट्य संघास अनुक्रमे ७ हजार, ५ हजार व ३ हजार रुपये तर उत्तेजनार्थ २ हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत. तर लावणी नृत्य खुला गटामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्या नाट्य संघास अनुक्रमे १० हजार, ७ हजार व ५ हजार रुपये तर उत्तेजनार्थ ३ हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649